# श्यामची आई

साने गुरुजी



शुभम् साहित्य

चला वाचन
संस्कृती टिकवूया...

पुस्तके वाचू या...

या... पहा... खरेदी करा...
स्वतःचे ग्रंथदालन समृद्ध करा...



शुभम् साहित्य

पत्ता : ६७६ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०,
फोन नं : 020 2447 4322
मो. नं 98224 54136,
Email : shubhamsahityabooks@gmail.com
www.shubhambookonline.com



9 788194 186519
₹ 180


शुभम् साहित्य



# श्यामची आई

अर्थात

आईच्या प्रेममय थोर शिकवणुकीमुळे सरळ,
साध्या व सुंदर संस्कृतीचे एक करुण व गोड कथात्मक चित्र.


लेखक

**साने गुरुजी**, एम.ए.



SBES COLLEGE OF ARTS & COMMERCE LIBRARY
ACC. NO.
93045
DEGREE COLLEGE
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR



शुभम् साहित्य

www.shubhambooksonline.com

# -: प्रस्तावना :-

पवित्र वस्तूला प्रस्तावनेची काय जरुरी? सुंदर, सुगंधी वस्तूचा परिचय कशाला करून द्यावयास हवा? 'श्यामची आई' हे पुस्तक सुंदर, सुगंधी व सुरस आहे की नाही ते मला माहीत नाही; परंतु पवित्र आहे असे मी विनयाने म्हणू शकतो. हृदयातील सारा जिव्हाळा येथे ओतलेला आहे. या गोष्टी लिहीत असताना माझे डोळे शतवार ओले झाले होते. हृदय गहिवरून व उचंबळून आले होते. माझ्या हृदयात मातेबद्दलच्या असणाऱ्या प्रेम, भक्ती व कृतज्ञता यांच्या अपार भावना 'श्यामची आई' वाचून जर वाचकांच्या हृदयातही उत्पन्न होतील तर हे पुस्तक कृतार्थ झाले असे म्हणता येईल. हे पुस्तक वाचून वाचकांचे डोळे व वाचकांचे हृदय ही जर कोरडीच राहतील तर हे पुस्तक त्याज्य, व्यर्थ व नीरस समजावे.

तुरुंगात असतानाच या रात्री मी लिहिल्या. दिवसा काम करावे. रात्री जगन्माता, भारतमाता व जन्मदात्री माता यांच्या विचारात रंगावे, असे तेथे चालले होते. तुरुंगात अनेक मित्रांना या रात्री आवडल्या. त्यांना वाचून दाखवीत असता तेही रडले व मीही रडलो. बाहेरही ज्या ज्या माझ्या अनेक बंधुभगिनींनी या रात्री वाचल्या, त्यांनाही तसाच अनुभव आला. मुलांसाठी चाललेले 'शालापत्रक' हे जे सुंदर मासिक, त्यातून यातील काही थोडा भाग प्रसिद्ध करण्यात आला होता. 'शालापत्रका'च्या संपादकांना अनेकांची पत्रे आली व या सरळ, सहृदय व भावनोत्कट गोष्टींची त्यात स्तुती होती. या सर्व प्रकारामुळे धीर येऊन मी हे पुस्तक प्रसिद्ध करावयास दिले. मातेबद्दल ज्यांना ज्यांना म्हणून काही भावना आहेत, मायलेकरांच्या थोर व पवित्र प्रेमाबद्दल ज्यांना ज्यांना म्हणून काही वाटत असेल, त्या सर्व अधिकृत रूचीच्या लहानथोर बंधुभगिनींस 'श्यामची आई' हे कथात्मक पुस्तक आवडेल व ते ते हृदयाशी धरतील अशी मला सश्रद्ध आशा आहे.

या बेचाळीस रात्रींतील छत्तीस रात्री नाशिक तुरुंगात लिहिल्या होत्या. बाहेर आल्यावर नऊ रात्री लिहिल्या. एकूण पंचेचाळीस रात्री व्हावयाच्या; परंतु तीन रात्री काही कारणांमुळे मी सध्या वगळल्या आहेत. नाशिक तुरुंगात ९/२/३३ गुरुवारी ह्या रात्री लिहावयास मी सुरूवात केली व १३/२/३३ सोमवारी पहाटे त्या संपविल्या. पाच दिवसांत दिवसा काम करून उरलेल्या वेळात रात्री आणि पहाटे मिळून हे पुस्तक मी लिहून काढले. हृदय भरलेलेच असे. भराभरा शाईने कागदावर ओतावयाचे एवढेच उरलेले असे. हे पुस्तक वाचून कोणी माझे चरित्र बनवू नये. जरी त्या सत्यकथा आहेत तरी त्यांत क्वचित् एखादी व्यक्ती, एखादा प्रसंग, एखादा उद्‌गार काल्पनिक असण्याचाही संभव आहे.

मातेचा महिमा हे या पुस्तकातील मध्यसूत्र आहे. त्याबरोबरच सुसंस्कृत व बालबोध घराण्यातील साध्या, सरळ व रम्य संस्कृतीचे चित्रही यात आले आहे.



SBES COLLEGE OF ARTS & COMMERCE LIBRARY
ACC. NO.
DEGREE COLLEGE

श्यामच्या आईच्या आठवणी देताना श्यामच्या गोष्टी यावयाच्याच. पुष्कळांना असे वाटत असेल की, या श्यामच्याच गोष्टी आहेत. परंतु त्या गोष्टींतून शेवटी मातेचे प्रेमच बाहेर पडलेले दिसेल. झाडाचा सारा फांद्यापानांचा विस्तार वर येणाऱ्या दहावीस फुलाफळांसाठी असतो, त्याप्रमाणे श्यामच्या हालचालींची सारी हकीकत त्यातून शेवटी बाहेर पडणाऱ्या अमृतमय अशा मातेच्या प्रेमासाठी आहे. आईचा एखादा उद्‌गार, एखादा शब्द सांगण्यासाठी श्यामला स्वत:च्या कृत्याची व सभोवतालच्या परिस्थितीची कल्पना देणे भाग पडे. ह्या पार्श्वभूमीवर तो आईचा एखादा उद्‌गार चितारी. अनंत निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर लहानसा चंद्र मिरवतो त्याप्रमाणे श्यामच्या स्वत:च्या कथांच्या पार्श्वभूमीवर हा मातृप्रेमाचा चंद्र मिरवत आहे. श्यामला स्वत:चा मोठेपणा किंवा प्रौढी सांगावयाची नसून आईची प्रेममय शिकवणच त्याला प्रकट करावयची आहे. आईला पूर्णपणे प्रकट करण्यासाठी म्हणूनच स्वत:ला त्याने प्रकट केले आहे. त्याने प्रकट होणे म्हणजे ते त्याच्या मातेचेच प्रकट होणे होय.

हे हस्तलिखित आतापर्यंत साठसत्तर लोकांनी ऐकले व वाचले आहे. ते त्यांना आवडले. 'आईबद्दलची आमची भक्ती व प्रीती हे हस्तलिखित वाचून शतपट वाढली.' असे प्रांजळपणे मी न विचारताच ते मला म्हणाले. या पुस्तकाचे काम झाले आहे. ते महाराष्ट्रात खपले नाही तरी त्याचे कार्य झाले आहे. स्वत: ते लिहीत असताना मला अपार आनंद लुटावयास मिळत होता हा काय कमी फायदा? परंतु मी आसक्तिमय आशा बाळगून राहिलो आहे की, 'श्यामची आई' घरोघर जाईल; मुलांची मने बनवू पाहणाऱ्या पाठशाळातून, निदान दुय्यम शिक्षणाच्या पाठशाळांतून तरी ते जाईल. ते जावो न जावो; परंतु आज माझ्या अनेक मित्रांच्या प्रेमाच्या मदतीमुळे श्यामची आई माझ्या घरातून सर्वांना भेटण्यासाठी बाहेर पडत आहे. तिने स्वत:च्या मुलाला वाढविले त्याप्रमाणे इतर मुलाबाळांनाही वाढविण्यासाठी ती बाहेर पडत आहे. उघड्या दारांतून ती आत शिरेल. बंद दारे ठोठावून पाहील. परंतु सारीच दारे बंद झाली तर? तर ती माझ्या घरात येऊन राहील; माझ्या हृदयात तर ती आहेच आहे.

दासनवमी, शके १८५७
लीलासदन, सदाशिव. पुणे २.

**पांडुरंग सदाशिव साने**

■■■

ACC. NO.